श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष १५ ] पौष, माघ, फाल्गुन [ अंक १०-११-१२

शके १८६०

O. T.

21 OCT 1939



नलिनीदलगत जलमतितरलम् तद्वज्जीवनमतिशय चपलम्
क्षणमपि सज्जनसंगतिरेका भवति भवार्णव तरणे नौका

1058

—शंकराचार्य

संपादक—रामचंद्र वासुदेव पैसास

# अनुक्रमणिका


| विषय | | | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| अनुभव | ... | ... | ... | ... | १ |
| प्रचारकार्य | ... | ... | ... | ... | २२ |
| पुण्यतिथि | ... | ... | ... | ... | २९ |
| शिर्डीवृत्त | ... | ... | ... | ... | ४२ |
| आढावा | ... | ... | ... | ... | ५१ |


## श्रीसाईभक्तांस विनंती

श्री. साईभक्तांस सप्रेम विनंति करण्यांत येत आहे की पुष्कळ भक्तमंडळींच्या पत्त्यांत फेरफार झाल्यामुळें त्यांना पोष्टांतून पाठविलेल्या उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका व प्रसाद न पोहचतां परत येतांत तर कृपा करून त्यांनी आपलें पत्ते फेरबदल झाल्यास आम्हास कळवावे.

श्री ना. खारकर
ऑ. चिटणीस
श्री साईबाबा शिरडी संस्थान

## विनंती

वर्गणीदारांस नम्र विनंती करण्यांत येत आहे कीं ज्यांनीं गेल्या-सालची म्हणजे शके १८६० ची ३ रु. ६ आ. वर्गणी अद्याप पाठविली नाहीं, त्यांनीं कृपा करून ती खालील पत्त्यावर मनिऑर्डरनें पाठवून द्यावी, अथवा व्ही. पी. करण्याचें सुचवावें.

श्री साईभक्तांनी आपले अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध करण्याकरितां कृपाकरून पाठवावेत. ज्यांना आपलें नांव प्रसिद्ध होणें नको असेल त्यांनीं आपलें टोपण नांव व आपला पत्ता कळवावा म्हणजे तशी व्यवस्था होईल.

रा. वा. घैसास, संपादक.
लो. टिळक ज्युबिली ट्रस्ट बिल्डिंग नंबर २,
गोखले रोड नॉर्थ दादर, मुंबई १४.

I request to subscribers that those who have not yet paid the subscription Rs. 3-6-0 of this magazine Shake-year 1860, should pay or Intimate to send the magazine by V. P.

R. V. Ghaisas,
Editor—Sailila Lokamanya Tilk Jubilee Trust Bldg.
Gokhale Rd. Dadar—Bombay 14.

श्री साईबाबा



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकं ।
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्याऽनिशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ।
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥



# अनुभव

## संपादकांचा अनुभव

### लेखांक ३ रा

सुमारें चार वर्षामागें माझ्या कुटुंबाला अर्धांग वायूनें पछाडलें होते. त्यावेळेस तिला एक वाताचा झटका आला. हा झटका इतका तीव्र स्वरूपाचा होता कीं,— आमच्या जवळचे म्हणजे नातलगातलें डॉक्टरांनी देखोल तिच्या विषयीं सर्व आशा सोडून देऊन आजची परिस्थिति वाईट आहे असें सांगून तिच्याबद्दल योग्य ती काळजी घेण्यास बजाविलें. त्याप्रमाणें आम्ही ( मी व आमचे चिरंजीव ) तिच्या जवळ बसून सगळी रात्र जागून काढली. त्या रात्रीं ती बेशुद्ध अवस्थेंत असतां ( आम्हास बेशुद्ध

आहे असे वाटत होते, परंतु ती खरी शुद्धिवर होती. ) तिला एक स्वप्न पडलें. तिनें स्वप्नांत असें पाहिलें कीं, आपल्याला शेवटच्या विधि करितां नेण्याची सर्व तयारी आपल्या दाराच्या बाहेर कांही लोक करीत आहेत. हे पहातांच ती घाबरून जाऊन तिनें बाबांचे ध्यान केलें. इतक्यांत श्री. साईबाबांची सुंदर तेजस्वी मूर्ति तिला दिसली.

बाबांनीं त्या जमलेल्या लोकांना ' ही सर्व तयारी कोणा करितां चालविलींत ' असें विचारलें. तेव्हां लोकांनीं सर्व हकीगत त्यांनां सांगितली. तेव्हां बाबा रागानें उद्गारलें—छेः हे असे होणें आज तरी शक्य नाहीं. तेव्हां ह्या घरीं कांहीं हें असें करूं नका' तुम्ही घर चुकला आहांत—जरा विचार करा—पण थांबा, मीच सांगतो—ते पहा समोरच्या घराकडे लक्ष द्या. आणि त्या घरीं जाऊन पहा—असे म्हणून त्यांनीं स्वतः ते बांबू, मडकें वगैरे साहित्य लांब भिरकाऊन दिलें व आपण अदृश्य झालें.

पण काय चमत्कार पहा ! खरोखरीच समोरच्या घरीं त्या रात्रीं एक मनुष्य हृदयक्रीया बंद पडून तो परलोकीं गेला. इतक्यांत ती खडबडून जागीं झाली. म्हणून आम्ही सर्व जणांनीं तिला घाबरण्याचे कारण विचारलें. तेव्हां तिनें आम्हांला अडखळत अडखळत हा सर्व वृत्तांत तिनें आम्हांला निवेदन केला. मग आम्ही तिची समजूत घालून तिला धीर दिला.

ती बाबांची परमभक्त असल्यामुळें त्यांच्या कृपेनें तिला पूर्ण बरें वाटून त्यांतून उठल्यावर आम्ही तिला घेऊन बाबांच्या दर्शनास शिरडीस घेऊन गेलो.

—संपादक

———

# EXPERIENCE OF THE EDITOR

My wife then had an attack of Paralysis. Her condition grew worse and the Doctor, a junior relation of mine, warned me to be watchful on a particular night as he thought that was going to be the time for crisis when she might collapse. Myself and my son were keeping wake the whole night, and my wife in her unconscious state had a dream in which she saw, all arrangements ready to take her to the burning ground and a host of the carriers assembled at the door, for the purpose. But at the same time she saw Baba at the door who was asking the men gatherd there to clear off from there as they had no business there, but at the next door. But when the men seemed obstinate 'Baba' kicked off the articles and drove them away. She woke up and narrated this to us. After this she completely recovered from the 'paralysis Attack,' and went to Shirdi to take the Darshana of Sai Baba. (That very night a shopkeeper who was quite alright died of heart failure just in the apposite building)

—Editor

# वसंतराव गोरक्षकर यांजकडून साईलीलेंत
## प्रसिद्ध होण्याकरितां
## मोतीलाल सुंदरराव रणजित यांचे
# अनुभव

( १ )

माझे मित्र श्री. ज. तु. परूळकर बी. ए. एल्एल्. बी. ॲडव्होकेट ह्यांस एक अनुभव आला. गतवर्षी आमच्या कांहीं वकील मित्रांनीं वज्रेश्वरीस जाण्याचा बेत केला. दिवस व वेळा नक्की झाली. निघण्याचें आधल्या दिवशीं सायंकाळीं मला श्री. परूळकर म्हणालें कीं, " मला कांहीं येता येत नाहीं. कारण माझ्या मुलीस मेनिंगजायटिस झाला आहे व तिची प्रकृति चिंताजनक आहे. " त्याच रात्री उदीची पुडी घेऊन मी श्री. परुळेकरांकडे गेलो. त्यांना सांगितले कीं ह्यांतील उदी मुलीच्या कपाळीं लावा, तोंडांत घाला व पुडी उशाखाली ठेवा. काळजी करण्याचें कारण नाहीं. उद्यां तुम्ही आमच्या बरोबर याल अशी माझी खात्री आहे.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं श्री. परूळकरांना मोटार बस जवळ पाहून मला आनंद झाला. त्यांना विचारतांच ते म्हणाले, " उदीचा गूण अजब आहे. माझ्या मुलीचा ताप साफ काढला. " त्या दिवसापासून श्री. परूळकरांना उदी पुरविण्याचें कॉन्ट्राक्ट माझ्याकडे आहे.

( २ )

मुंबईचे रहिवाशी नवलकर बंधू ह्यांस मेहेरबान फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट, कोपरगांव, कोर्टाची शिरडी येथील नवलकर वाडयासंबंधीं नोटीस लागली. नवलकर बंधूंचें वकीलपत्र घेऊन मी कोर्टांत जाण्यासाठीं निघालो. मनांत विचार आला कीं कोपरगांवला जाण्यापूर्वीं शिर्डीस जावें. श्रीचे दर्शन घ्यावे, नवलकर वाडयाची प्रत्यक्ष पहाणी करावी व मग कोपरगांवच्या कोर्टांत जावें. त्या प्रमाणें मी शिर्डीस गेलो. ह्या पूर्वी मी तीन चार वेळा शिर्डीस गेलो होतों पण या वेळेस श्री. साईबाबांच्या प्रेरणेनें रा. रा. माधवराव देशपांडे ह्यांनीं स्वतः होवून मला बाबांच्या हातची उदी दिली. उदी घेवून कोपरगांव कोर्टांतील काम संपवून मी ता. ५ रोजीं मुंबईस पोहोंचलो. घरीं येतांच मला

कळलें की माझा मुलगा चि. अरूण कुमार अंधेरीस त्याच्या आजोळी गेला आहे. काय असेल ते असो त्याला पहाण्याची मला अनावर इच्छा झाली. तसाच मी अंधेरीस गेलो. मुलास ताप आला आहे असें कळले. त्याच्या अंगाला हात लावतांच माझ्या हाताला चटका बसला. ताप १०५ डिग्री होता. माझ्या जवळ असलेली अमृतवल्ली ( उदी मी श्रीच्या परमपूज्य चरणांचें स्मरण करून कपाळी लावली व तोंडांत घातली. उदी तोंडांत घालतांच मुलगा जागा झाला व " हें काय " असें त्यानें मला विचारलें. " बाबांची उदी " असें म्हणतांच स्वयंस्फूर्तीनें त्या सांडेतीन वर्षांच्या सांडतांन हाताच्या देहानें दोन्ही हात जोडले ( हा चिमुकला जीव कोणत्याही देवास हात जोडीत नाही. ) दुसऱ्या दिवशी सकाळी ६-३० च्या सुमारास नित्याप्रमाणें ही स्वारी ओटीवर धुमाकूळ घालीत होती. यक्षणीच्या कांडी प्रमाणें ताप साफ काढला होता. हा मुलास काल १०५ डिग्री ताप आला होता असें जर कोणास सांगितलें असतें तर त्यानें सांगणारास वेड्यात काढलें असतें.

काय ही बाबांची अद्भूत ! करणी श्रींची कृपादृष्टी श्रींच्या सर्व बालकांवर सदोदीत अशीच राहो हीच श्रीचरणी विनंति.

श्री. विनायक आप्पाजी वैद्य दादर यांजकडून

रा. रा. कोलेंकर, अंधेरी, यांचा श्री. साईबाबांचे

# उदीबद्दलचा अनुभव

दादर ता. २६-९-२९

रा. रा. चिटणीस साई लीला ऑफीस.

कृ. सा. न. वि. वि. खालीं एक ताजा अनुभव देत आहे तो साईलीलेंत छापल्यास साई भक्तांची श्रद्धा दृढ होईल अशी आशा आहे.

माझ्या बायकोला नऊ महिने पुरे झाले होते व शुक्रवार ता. २२ पासून तिचें थोडें थोडें पोट दुखावयास लागलें. शनिवार ता. २३ रोजीं सकाळीं ८-४५ वाजतां तिला हॉस्पिटलमध्यें दाखल केली. शनिवारीं बाळंत झाली नाहीं म्हणून रविवार ता. २४ रोजीं सकाळीं तपास करण्यास गेलों, तरी बाळंत झाली नव्हती. हॉस्पिटल मधील नर्सेस म्हणत होत्या कीं पोटांत मूल दगावलें असेल, म्हणून ती फार घाबरली होती. मी तिला धीर देऊन सांगितलें कीं घाबरण्याचें कारण नाहीं. आपले देव व श्रीसमर्थ साईबाबा तुझा बचाव करतील. मी घरीं जाऊन अंगारा व उदी फुंकतो म्हणजे तूं बाळंत होशील. घरीं आल्यावर स्नान वगैरे करून व देवपुजेला बसलों आणि अंगारा फुंकला व थोडा उदी घेऊन पाण्यांत घालून मी स्वतः पियालों व पोटाला लाविली. त्यावेळीं दिवसा १२ वाजले होते. सायंकाळीं माझ्या दोन मोठ्या मुलांनां तपास करण्यास पाठविलें तों त्यांनां कळलें कीं १२-३ वाजतां बायको बाळंत होऊन मुलगा झाला. बाळबाळंतीण सुखरूप आहेत. धन्य ती माऊली कीं जिचा प्रसाद मी प्यालों असतां त्याचा परिणाम २ मैल लांबीवर असलेल्या बाळंतपणाच्या खोलींत बायकोवर झाला.

श्री बाबांचा भक्त.

## श्री. वसन्त नारायण गोरक्षकर यांजकडून

## श्री साईलीलेंत प्रसिद्ध होणेकरितां

# आलेला अनुभव

सान्ताक्रुज ता. २६–९–३५.

श्री साईलीला संपादक महाशय यांसः—

कृ. सा. न. वि. वि. आपल्या इच्छेला मान देऊन खालील अनुभव पाठविला आहे तर आपणास पसंत असल्यास प्रसिद्ध करावा. ता. २४--९--३५ रोजीं आपण इच्छा दर्शविली कीं कांहीं अनुभव पाठवावें त्या दिवसांपासून मी विचार करित होतों, तोंच श्रीसाईलीला वर्ष २ रें शके १८४६ अंक १ पान २३ नंबर ७९ वर्ष ११ वें शके १८५६ अंक ११ पान ८--१४ ही पुस्तके माझ्या हाती लागली. वरील पानांमध्यें माझें अनुभव आहेत व त्या खेरीज इतर लीलेच्या अंकांत आहेत. तेव्हां विचार सुचला कीं मी शिर्डीस प्रथम केव्हां गेलों व जाण्याचें कारण काय ? ह्याची साधारण माहिती अनुभव रूपानें द्यावी.

साई भक्तांचा दास

साईदास

मला लहानपणापासून साधूसंतांच्या गोष्टी ऐकण्याची हौस व कुचेष्टाही करण्याची फार संवय. माझी वडील माणसें केव्हां केव्हां श्री अक्कलकोट महाराज ह्यांच्या गोष्टी व स्वतःचें अनुभव सांगत असत. [ माझें वय साधारण १२ असावें ] तेव्हां मी एक चित्तानें ऐकत असे व मला वाटत असें कीं, आमच्या वेळेस स्वामी असते तर मी दर्शन घेऊन आलों असतों, व मला वाटत असे कीं आतां आमचे वेळेस साधु नाहींत सर्व भोंदू बुवाच आहेत.

एखाद वेळेस घरांत गोष्टी चालावयाच्या कीं अमुक माणसाच्या अंगांत खंडोबा येतो, अमुक बाईच्या अंगांत एकविरा देवी येते त्या वेळेस माझे पित्त खवळत असे. मग त्यांना रागानें म्हणावयाचा कीं, तुम्हीं त्याना देव म्हणूं नका त्यापेक्षां डॉक्टरास देव म्हणा

कारण तो सुश्रुशा करितो. तुम्हांला जर त्याचा गुण येत असेल तर भले, परंतु हीच माणसे तुम्हांला थोडासा गुण आला असे म्हटल्याबरोबर त्यांची वृत्ती कशी फिरते व ते काय सांगत असतात " मला तर कांहीं नको, पण माझ्या देवांला २ मण साखर, सोन्याचा मुकुट व सरी देईन असे कबूल करा म्हणजे तुम्हांला कोणीही जादू केली त्याचा नायनाट करीन, " परंतु संतांचे तसें नाहीं. संत भावाचा भुकेला.

मी मनोमय असा निश्चय केला कीं, श्री अक्कलकोट स्वामीच्या दर्शनाचा लाभ झाला नाहीं, तेव्हां आपण नोकरी करावयास लागलों कीं श्रीच्या पादुकांचे दर्शनास जाऊं. परंतु नोकरीस लागल्यापासून ९ वर्षे झालीं, तरीही दर्शनास जाण्याची इच्छा झाली नाहीं. व १९१२ सालीं दर्शनास गेलो तेही केव्हां तर स. १९११ सालीं श्री साईबाबाचें दर्शन झाल्यानंतर.

. घरांत केव्हां गोष्टी निघत कीं अमक्याच्या अंगांत खंडोबा येतो, एकविरा येतें, अमुक ठिकाणी साधू आला आहे असें ऐकत असल्यामुळें माझ्या मनावर वाईट परिणाम झाला व त्यांची मजा पहावयास जात असे व प्रत्येक वेळेस त्यांच्या भक्तमंडळांची व माझी चकमक होत असे व मी म्हणावयाचें कीं ह्या मनुष्यांत राम नाहीं. सर्व थोतांड आहे.

सन १९१० मध्यें सान्ताक्रूझ येथें आमच्या ज्ञातींतील कै. हरिश्चंद्र सखाराम क्रिर्तीक्रर यांचे घरीं त्यांचे जामात श्री. नारायण विश्वनाथ प्रधान, बॅरिस्टर, रा.ब. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान Advocate ह्यांचें धाकटे बंधू नारायण होत ) ह्यानीं ह. भ. प. दासगणू महाराज यांचे किर्तन करविलें होते, त्या दिवशीं मी प्रथमच श्रीसाईबाबांचे नांव ऐकले ( साई-मुसलमान ) दासगणचे पद ॥ साई रहिम नजर करना ॥ तेव्हां मला गुढ पडले कीं ब्राह्मण साइची इतकी महती गातात तर आपण नाताळांत साईची मजा पहावयास जाणारच, परंतु साईलीलाच और, नाताळमध्यें माझी कांही मित्रमंडळी शिर्डीस गेलीं पण, माझे कांहीं जाणें झालें नाहीं.

सन १९११ मध्यें मुंबईस प्लेग सुरू होता व आम्ही नेहमी प्रमाणें आमच्या ज्ञातीच्या हेल्थ कॅम्पमध्यें राहाण्यास गेलो होतो. मे महिना लागला कीं कॅम्पमध्यें सार्वजनिक श्री सत्यनारायणाची पूजा करून सर्वांनी आपापल्या जागीं जावयांचे. त्याप्रमाणें मे महिन्यांत पूजा ठरली, व माझी व पुढारी मंडळीची थोडी चकमक झाली, तेव्हां मी विचार केला कीं ज्या दिवशी पूजा असेल त्या दिवशीं आपण शिर्डीस जावे. मी केव्हांही एकट्यानें कल्याणचे पुढें प्रवास केला नव्हता म्हणून एका मित्रास माझ्या बरोबर येण्यास बोलावले, परंतु त्यानें ऐन वेळेस फसविलें व मला एकट्यालाच जाणें भाग पडलें. कोपर-

गांव स्टेशनवर उतरतांना आमच्या ज्ञातींतिल एक कुटुंब अनओळखी भेटलें व त्यांच्या-बरोबर मी शिर्डीस गेलो व त्यांच्याच बरोबर रावसाहेब साठे यांचे वाड्यांत राहिलों. ( सध्याचा नवलकर वाडा ) मी पूर्वी ऐकत असें कीं साईबाबा लोकांना कांहीं दिवस अडवून ठेवीत व दक्षणाही बरीच मागत असत, म्हणून मी माझ्याबरोबर बेडिंग व उपहाराचें पदार्थ बरोबर नेलें होतें, तेवढें परत आणिलें.

प्रथम मी मशिदीच्या दारांत उभा राहून नमस्कार केला व बूट काढावयास लागलों तोंच बाबानीं रागानें खुप शिव्या हासडल्या व त्यांत माझें वर्मच वर्म काढिलें. तेव्हां मला वाटलें कीं येथें राम आहे. बूट काढून आंत जातांच बाबा म्हणाले "या रामदास" तेव्हां मी घोटाळ्यांत पडलों व भित भित खांबाजवळ उभा राहिलों. श्रीनें पेढा दिला तेव्हां मला धीर आला व त्यांची शांत वृत्ती पाहून मला काय वाटलें असेल हें लेखणींतून येणें शक्य नाहीं. हळुहळु जवळ जाऊन पाय चेपू लागलों तेव्हां बाबा फार हंसले व नंतर गोष्टीस सुरवात झाली. त्या सर्व माझ्याबद्दल असाव्या परंतु मला त्याचा कांहीं त्यावेळेस उलगडा झाला नाहीं. नंतर शिवभक्त मेघा आरतिस उभे राहिले व मी बाहेर जाऊन कठड्याच्या जवळ हात जोडून उभा राहिलो. मधन मधून बाबा कांहीं बोलत व वेडेवाकडे तोंड करून हंसत होते. माझे सर्व लक्ष श्रीच्या लीला पहाण्याकडे होते, व मधून मधन मला वाटत असें कीं, हे कोणीतरी अवलीयापुरुष आहेत. केव्हां मनांत येई कीं हे मुसलमान खास नसावें कोणीतरी ढोंगी व मतलबी असावेत. आरती आटोपल्यावर मी दक्षणा दिली व त्यानी कपाळास उदी लावली व म्हणाले कीं "वाड्यात जा. परत येऊं नको." आरति आटोपल्यावर आम्ही काकासाहेब दिक्षितसाहेबांचें येथें जेवावयास गेलो, कारण त्या दिवशीं जी मंडळीं आली होती त्यांना काकासाहेबाच येथील आमंत्रण होते. मी संध्याकाळीं श्रीचे दर्शनास गेलो व सांगितले कीं मी आतां जातो. तेव्हां श्री म्हणाले कीं "एक रुपया दे" मी ताबडतोब दिला. बाबा म्हणाले "उदी लेव" तेव्हां तेथे एका अनओळखी मनुष्यानें सांगितलें कीं धुनींतून उदी घ्या व बाबांच्या हातात द्या. त्याप्रमाणें मी केले. श्रीने उदी हातात दिली व कपाळी लाऊन "अल्ला मालिक है. जा." असें म्हणाले.

संध्याकाळीं शिर्डीहून निघालो ( चारपांच दिवस अडवून ठेवितील म्हणून थोडे-बहुत सामान बरोबर नेले होतें. व दक्षणा मागतील म्हणून पांच पंचवीस रुपये सुटे ठेविलें होते. परंतु श्रीनें एकच रुपया मागितला तेव्हां त्यांचा काय हेतू आहे हें कांहीं अजून उमजत नाहीं. ) व दुसऱ्या दिवशीं मुंबईस आलों व परत शिर्डीस जावें असें वाटलें नाहीं.

सन १९१२ मध्यें गुडफ्रायडेच्या एक आठवड्याच्या अगोदर शनीवार रोजीं कांहीं मंडळी शिर्डीस गेली. त्या वेळेस मला वाटलें कीं आपणही जावें. परंतु मी डगमगूं लागलों व शिर्डीस न जातां त्याच रात्रीं पुण्यास गेलो. व तेथें हॉटेलमध्यें राहिलों व सोमवारी परत येताना हॉटेलवाल्यास सांगितलें कीं, गुडफ्रायडेच्या रजेमध्यें मी येतों माझ्याकरिता एक स्पेशल बेड रिझर्वड् ठेवावा. परंतु मजा अशी झाली कीं गुडफ्रायडेला पुण्यास न जातां शिर्डीस गेलो व त्यावेळेपासून मे महिन्यापर्यंत प्रत्येक शनिवारी शिर्डीस जाऊन सोमवारी ऑफीमध्यें येत होतो. ह्या प्रत्येक वेळेस मला नानातऱ्हेचे अनुभव आले आहेत ते बहुतेक साईलीलेंमध्यें दिलें आहेत. व आजपर्यंत मी श्रीच्या दर्शनास जात असतोच. केव्हां विचार केला कीं आपण अमुक एक दिवशी शिर्डीस जाऊ तर होत नाहीं. केव्हां केव्हां विचार नसतांही आठवड्यांतून दोन वेळां जाऊन येतो. सध्याचें ताजे उदाहरण म्हणजे संस्थान कमिटीवर मी असतांना माझें व कांहीं मंडळीचें मतभेद झाल्या-मुळें मी राजीनामा दिला व विचार केला होता कीं, आतां आपण फक्त श्रीच्या दर्शनास जावयाचे बाकी संस्थानचा संबंध नको. परंतु श्री साईबाबांची लीला कांहीं अगाध आहे. तेव्हां श्री साईबाबानी ह. भ. प. दासगणुमहाराज यांचे तोंडून रामनवमी उत्सवांत मला बोधामृत पाजलें. व त्याचा परिणाम असा झाला कीं आज मला संस्थानचा एक सेवक ( ट्रस्टी ) हा मान मिळाला. श्री साईबाबाजवळ एवढीच विनंती आहे कीं, आपण प्रत्येक भक्तांचे त्याच्या भक्तीप्रमाणें कल्याण करित आहांत तर संस्थानमधे दुफळी माजून देऊं नका. आपलें नाटक पुरें करून आम्हां सर्व साईभक्तांना एकत्र भोजन घालावें.

साईभक्तांचा दास,

**साईदास**

# रा. ब. मोरेश्वरराव प्रधान बी. ए. एलएल. बी.
# ॲडव्होकेट, ओ. एस्. मुंबई हायकोर्ट
# यांचा
# श्री. बाळकृष्ण विश्वनाथ देव, बी. ए.
# रिटायर्ड मॅजिस्ट्रेट यांजकडून आलेला
# अनुभव

---

रावबहादुर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान बी. ए. एल्एल्. बी. ॲडव्होकेट ओ. एस्. मुंबई हायकोर्ट, सांताक्रूझ निवासी, यांचे ज्येष्ठ चिरंजीव सुमनराव यांना व त्यांच्या मातुःश्री सौ. छोटूबाई यांना सुमनरावांचे गंभीर ( serions ) आजारीपणामध्यें घरीं व डॉक्टर मूळगांवकर यांचे इस्पितळांत पडलेलीं, बाबांच्या अगम्य लीलेनें भरलेलीं, सुमनरावांच्या अजारीपणाचें व शस्त्रक्रियेचें ( operation ) यशानंद पर्यवसान दर्शविणारीं व त्याप्रमाणें प्रत्यक्ष प्रततिसि आलेलीं सुंदर व मोहक स्वप्नें.

" चि. सुमन हा रविवार ता. २४-९-३३ रोजीं पोटांत कळ येऊन सायंकाळीं ६ ला तापानें अजारी झाला. ताप मलेरियाचा किंवा इन्फ्लुएंझाचा आहे या विचारांतच २-३ दिवस गेले. त्याच्या उजव्या पायाच्या वर पोटांत फार दुखत होतें. ता. २७ बुधवार रोजीं मी शिरडीस जाणार होतों. तो बेत सुमनच्या तापामुळें रहित केला. पण त्याच दिवशीं सकाळीं श्री वसंतराव गोरक्षकर मजकडे आले व म्हणालें कीं काल एकाएकीं सुमन माझे स्वप्नांत दिसला. म्हणून मी आज बुधवार आहे तरी आलों. गोष्टी करतांकरतां वसंतराव म्हणालें काय बाबांची लीला असेल ती असो. तरी पण तुम्ही उद्यां दसऱ्याच्या दिवशीं रात्रीं सव्वा दहाच्या गाडीनें गेलांत तरी उत्सवास हजर व्हाल. व कदाचित् सुमन उद्यां हुशारही होईल. पण त्यांचें तें म्हणणें मला खरें वाटेना. दुसरे दिवशीं दुपारीं २ वाजतां वसंतराव पुन्हा आलें व म्हणालें, मीही आज जाण्याचा विचार केला आहे. अजून ६ तास आहेत. कदाचित् बाबा तुम्हास आजच्या गाडीनें शिरडीस नेतील. इतकें बोलून वसंतराव निघून गेले. सुमन आईच्या पाठीं

लागला की बेबीजवळून नारळाचें तोरण करीव व दादाजींना ( मला—मोरेश्वररावांना ) आज शिरडीस जाऊं दे. आईनें आपल्या मनाविरुद्ध होकार दिला, तरी पण तिनें तो प्रश्न डॉ. घासवाला यांचे रुकारावर ठेवला. डॉ. ७ वाजतां आले व म्हणालें सुमनला काय होत आहे ! दादाजींना जाऊं द्या. मी आहेच कीं नाहीं. मी शिरडीस गेलों व ता. २-१०-३३ ला परत आलों.

माझ्या पश्चात् सुमनची प्रकृती फार बिघडली. व त्वरीत निघून या अशें पत्रही आलें. पण रविवारीं दुपारीं म्हणजे जेव्हां काला कीर्तनाचा हार माझे गळ्यांत पडला तेव्हां इकडे सुमनचा ताप उतरला. घरच्या मंडळीस थोडा धीर आला. मी परत आल्यावर सुमनचा ताप ( Enteric ) अंत्र–आंतड्या संबंधी आहे असें कळलें. त्याप्रमाणें ( treatment ) उपाय सुरू केलें. असें ता. १८-१०-३३ पर्यंत चाललें. ते दिवस नरक चतुर्दशीचा. उष्ण परिमाण ( temprature ) ९८ होतें. पण ११॥ चे सुमारास प्रकृतिमान एकदम भयंकर बिघडलें व शक्तिपात ( Collapse ) होतो कीं काय असें वाटूं लागलें. वसंतरावांनीं डॉ. छया ( Chhaya ) स बोलावणें पाठविलें. ते म्हणालें सुमनचे आजच्या आज रक्त तपासून ( blood examination ) शस्त्र. क्रिया ( operation ) जर केली नाहीं तर अवस्था फार कठीण आहे. ( Case is serious ). वसंतरावांनी डॉ. घासवाला यांना बोलावलें. ते ११॥ वाजतां आलें व डॉ. मूळगांवकर यांचेकडे आजचे आज सुमन यांस न्यावा असें ठरलें. त्याप्रमाणें परिभ्रमण चक्रयानमध्यें ( ambulance car ) त्यास व त्याचे मातुःश्रीस बसवन डॉ. मूळगांवकर यांचे दवाखान्यांत त्यांनां नेण्यांत आलें. डॉक्टरनी सुमनला वरील चक्रयानमध्येंच खाली तपासून वर ( हॉसपिटलमध्यें ) रुग्णागारांत पाठवन दिलें. दुसरे दिवशी सकाळीं ८॥ वाजतां शस्त्रक्रिया ( operation ) यशस्वी रीतीनें पार पडली. सुमनबरोबर मी ( मोरेश्वरराव ) त्याची आई व नानाजी ( श्री सुंदरराव नवलकर ) असें वर गेलों. शस्त्रक्रियेचे वेळीं मला साईबाबा श्री द्वारकामाईत बसलेले व माझे गळ्यांत त्यांनीं आपला हार घालून, जवळ बैस, पेढा खा असें म्हणत आहेत असा देखावा मी पहात होतो. माझें मन चिंताक्रांत होतें. व त्यांतच हा भास. पाव तासांत शस्त्रकिया होऊन सुमनास खालीं आणून बिछान्यांत ठेवतांच शेजारीं नगारा, बजंत्री यांचा एकदम कडकडाट एकसारखा ५ मिनिटें सुरू झाला. नंतर सुमन शुद्धीवर आला.

रुग्णालयांत ( Hospital ) आलों त्याच रात्रीं रावबहादुर धुमाळही तेथें आले व म्हणालें मी एकाएकी नाशिक सोडून येथें आलों त्यांचें कारण मला आतां कळलें. मी सुमन करतांच आलों. तो बरा होईल.

## सांताक्रूज येथें ता. १०–१०–३३ रोजीं सौ. छोटूबाई यांना पडलेलें स्वप्न.

सौ. छोटूबाई काळजीनें ग्रस्त होऊन बसल्या होत्या. त्यांना बाबा म्हणाले, " अग अशी काय बसलीस. " " हें ते काय ! पुढचा महिना कठीण आहे. " पण हें म्हणतांना बाबांनीं " हं त्यांत काय " असें म्हणून मान झिटकारली. त्यांतून छोटूबाई-नीं असा बोध घेतला कीं तो महिनासुद्धां सुरक्षितपणें निघून जाईल. त्या जाग्या झाल्या.

हें स्वप्न सुमनला त्याच दिवशीं मुंबईत मुळगांवकरांचे रुग्णालयांत पडलेल्या स्वप्नास बरोबर जुळतें. ही बाबांची लीला !

× × ×

## त्याच दिवशीं म्हणजे मंगळवारीं ता. १०-१०-३३ रोजीं रात्रीं ९ वाजतां चि. साईप्रसाद ( सुमन ) यास इस्पितळांत पडलेलें स्वप्न.

एक साईबाबासारखा फकीर सुमनच्या खोलीबाहेर ओटीवर आला व त्याला म्हणाला कीं मला ५ भाकरी व मेथीची भाजी दे. सुमन म्हणाला मी कसा उठूं, मला उठतां येत नाहीं. फकीर म्हणाला तुझी मिजास नको मी साईबाबा आहे. माझे आईला बोलाव. तेव्हां सुमनची खात्री झाली कीं हे साईबाबा आहेत. कारण साईबाबा सुमनच्या मातुःश्रीस " आए " अशी हाक मारित असत. सुमननें आईला बोलाविलें. आईनें ५ भाकरी व एका निराळ्या ताटांत मेथीची भाजी आणिली. साईबाबांनीं भाकरी घेतल्या व " भाजी भाकरीवर टाक " असें म्हणाले. त्यांना भाजी फार आवडली. " आणखी भाजी आण. " आईनें आणखी भाजी आणिली. त्यांनीं सर्व खाल्लें. सुमन त्यांच्या पाया पडला. आई त्यांच्या पाया पडली. तेव्हां त्यांनीं आपले खिशांतून एक पुडी काढून त्यांतील पिंजर ( कुंकु ) आईचे कपाळीं लाविली, व त्याच खिशांतून आणखी ३ रुपये काढिले. व त्यांतून दोन रुपये आईस दिले तों तिसरा रुपया द्या असें आई म्हणाली. ते म्हणाले "आतां देत नाहीं. १५ दिवसानंतर देईन." पण आई ऐकेना. तेव्हां ते म्हणाले " बरें घे जा हा तिसरा रुपया. ' नंतर आपल्या

डोक्यावरचा फडका काढून आईचे डोक्यावरून तो तीन वेळां फिरविला. व म्हणाले. " कांहीं काळजी करूं नको. दिवस कठीण आले. त्यांना धीर धरून लोटेल पाहिजे. पैका गंज मिळेल. " चिंतू पायां पडला व बेबी पाया पडली, इतक्यांत त्यांनीं विचारलि " परधान कोठे आहे ? " आई म्हणाली ते कोर्टात आहेत. बाबा म्हणाले " मी आतां त्याचेचकडे जातों." असें म्हणून बाबा निघून गेले.

हें स्वप्न पडल्यावर १५-२० मिनिटांनीं एकाएकीं डॉ. शामराव नारायण नवलकर ( मारेश्वररावांचे आते बंधू ) न बोलवतांच आले. व त्यांनीं दरवाजा ठोठावला. डॉक्टरला विचारलें तुम्ही कां आलांत ? ते म्हणाले मला सौ. शांताबाई ( सुंदरराव नवलकरांचें कुटुंब ) संध्याकाळीं स्टेशनवर भेटली. तिनें तुझ्या मुलाची हकीकत कळविली. म्हणून सहज आलों. अर्थात डॉ. शामरावानें सुमनला पाहिलें व म्हणाले सर्व ठीक आहे. पण तुम्हां Glucose भरपूर सुरू करा. त्यानें जास्त फायदा होईल. त्याप्रमाण Glucose सुरूं केलें. त्यामुळें त्यांच्या हृदयानें ( heart ) पुढें येणारें वावटळीस दाद दिली नाहीं.

डॉ. शामरावांचे अकाली व अनाहूत येणें ( म्हणजे सुमनचे स्वप्नानंतर लागलीच) व Glucose सुरू करणें ही तरी बाबांचीच अघटित लीला ! !

ता. १८-१०-३३ रोजीं रुग्णालयांत गेलों. त्याच रात्रीं सौ. छोटूबाई अत्यंत चिंताग्रस्त असतांना त्यांना पडलेलें स्वप्न.

सर्व खोलीभर डोक्यावर झाडाच्या फांद्या व पानें भरलेल्या फिरत होत्या. छोटूबाई म्हणाल्या असें काय होतें हें ! जे गण ( बहुत करून अंतरालस्थ देवतागण असावें.) वरच्यावर हवेत बसून ( फांद्या ) फिरवीत होते, ते म्हणालें आम्ही असेंच करतों त्याच्या पूर्वी हे गण नाचत होते. तेव्हां बाबा त्यांच्या मधोमध उभे असून छोटूबाईस म्हणाले " operation successful " ( शस्त्रक्रिया यशस्वी ) इतक्यांत छोटूबाई जाग्या झाल्या, व लागलीच त्यांनीं सुमनला व दादाजींना ( मला ) हें स्वप्न सांगितलें. दादाजींनीं सुमनला व छोटूबाईना सांगितलें कीं ह्यापेक्षां जास्त बाबा तुम्हांस आश्वासन व धीर देणार तरी किती ! !

ता. २५-१०-३३ बुधवार दुपारचे ४॥ वाजतां ( 4/30 P. M. ) सुमनचे स्वप्न.

सांताक्रूझ येथील बाबांच्या ओटीवरच्या खोलींत साईबाबा आले. दादाजी मारेश्वरराव) खोलींत होते. चिंतू बेबी ही तिथेंच होती. आई देवखोलींत होती. बाबांनीं

३ रुपये खिशांतून काढिले. दादाजींनीं हात पुढें केला.बाबा म्हणाले"तूं भोळसट आहेस. नोटांनी तुझे खिसे भरले कीं तूं हे ( तीन रुपये ) कोणास देऊन टाकशील. माझे आएला बोलाव. " आई देवखोलीतून आली. बाबा म्हणाले " आये हे घे. आपटून बघ." तिन तें खरें आहेत असे पाहिलें. पहिलें ( १५ दिवसांपूर्वी सुमनच्या स्वप्नांत ) दिलेले त्यांत २ खरे होते व एक खोटा होता. तो बाबांनीं परत मागुन घेतला. व पहिले दोन होते ते बाबा म्हणाले " आये हे आतां खर्चून टाक " नंतर बाबांनीं आपले डोक्यावरचा फडका काढून आई व दादाजींच्या डोक्यावर फिरविला. व " जा आता, तुम्हांस कोठली काळजी नाहीं " असे बाबा म्हणाले. इतकें पाहून सुमन जागा झाला. हें स्वप्न पडत असतां सुमन एक सारखा हंसत होता. व कांहीं बडबडत होता. तें ( दादाजी ) मी ( आई ) छोटूबाई व तातीबाई पहात होतो.

मंगळवारी ता. १-०-१०३३ रोजीं रात्रीं ९ वाजतां पडलेल्या स्वप्नांप्रमाणें आजचा ( ता. २५-१०-३३ ) १५ वा दिवस ! बाबांचीही अगाध लीला कोणत्या मुखानें तरी वर्णन करावी ! !

ता. ९-११-३३ रोजीं पहाटेस मूळगांवकर रुग्णालयांत सुमनास पडलेलें स्वप्न.

आपण सर्व शिरडीस गेलों. व दादाजी व आई, बाबांची, त्यांचे समाधीवर, पंचामृती पूजा करीत आहेत. पूजा आटोपून गलेफ चढवीत आहेत. त्यावेळीं ( सुमन ) मी गोमुख कोरीत होतों. तों त्याला ( गायमुखाला ) भोंक पडलें. व त्या भोंकांतून पाहतों तों आंत साईबाबा बसलेले असून हंसत होते. त्यांच्या पाठीमागच्या दोन बाजूस सर्व वाती उजळलेल्या ( लावलेल्या ) दोन समया व पुढच्या बाजूस दोन उंच निरांजनें लावलेलीं होतीं. मी [ सुमननें ] हें पाहतांक्षणींच आईला हांक मारली. ( व तिला हें सांगितलें ) आई म्हणाली " चल वेड्या तेथें बाबा कसे दिसतील ? [ मनोहर ] [ ? ] ( बडूत करून सुमन म्हणाला ) " मी म्हणालों खरेंच मावशीबाई [ तातीबाई अगर छोटूबाई ] साईबाबा दिसतात. दादाजी तुम्ही पण या " तसेंच आई व दादाजी तेथें [ गायमुखा जवळ ] आले व त्या दोघांनीं बाबांस हंसत असलेले पाहिलें. व दादाजी म्हणाले " काय वंडर काय वंडर " ( आश्चर्य ).इतक्यांत मी जागा झालों.

केव्हढें तरी या सर्वांचें महद्भाग्य कीं बाबांनीं त्यांना मागें पुढें जळत असलेल्या समया वञनिरांजनें यासह समाधींतून दर्शन घ्यावें ! धन्य तीं स्वप्नें, धन्य ती मंडळी, धन्य तें कुल व धन्य ते बाबा. ! ! !

# अनुभव

## श्रीसाईबाबा व भिक्षा

॥ नम्र झाल्या, भूता । तेणें कोंडिलें अनंता ॥

सन १९३६ मधील हकीकत. मे महिन्याचे सुट्टीत लेखक पुण्यास गेला होता व त्यास ता. ६ जून रोजीं पुणें सोडून ता. ७ जून रोजीं कमिशनच्या कामाकरितां ठाण्यास हजर रहाणे जरूर होतें. सिंध ज्युडिशिअल कोर्टाकडून पक्षकारांनीं दिलेल्या भाईंदरास राहणाऱ्या साक्षीदारांच्या जबान्या घेण्याचें कमिशनचें काम ठाणे येथील मे. डि॥ जज्ज साहेब यांजकडून लेखकास देण्यांत आले होते. लेखकाने सदर साक्षीदारास ठाणे डि॥ कोर्टाकडून मुंबई स्मॉलकॉज कोर्टामार्फत ता. ७ जूनला ठाणे डि॥ कोर्टांत कमिशनरपुढें साक्ष देण्याकरितां समन्सें पाठविण्यांत आली होती. मे च्या सुटीनंतर ता. ८ जूनला ठाणे कोर्ट सुरू होणार होतें. ता. ३ किंवा चार रोजीं श्रींचे अत्यंत लाडके भक्त नाशिकचे सुप्रसिद्ध वकील रा. ब. भाऊसाहेब धुमाळ यांची भेट, पुण्यास नाईक वकील यांचे घरी झाली. भेटीचे वेळीं, रा. ब. अवस्थि, प्रो. गणपतराव नरके, व सध्यां मद्रासच्या बाजूला श्रीसाईनाथांच्या कार्याचा विद्युद्वेगानें प्रसार करणारे महान साईभक्त श्रीयुत नरसिंह स्वामी हजर होते. स्वामी त्यावेळीं श्रींच्या ठिकठिकाणच्या भक्तांच्या गांठी घेऊन श्रींच्या अनुभवांची टिपणें करण्याचें काम अत्यंत उत्साहानें व प्रयत्नानें करित होते. स्टेटमेंट्स् [ टांचणें ] घेण्याकरितां स्वामी धुमाळांचे भेटीस आले होते. सकाळची वेळ होती. ८, ८॥ चा समय होता. भाऊसाहेबांना कामाकरितां बाहेर जाणें होते. ते स्मश्रु करवून घेत होते. व घाईची व गडबडीची स्पष्ट चिन्हें त्यांच्या चर्येवर व हालचालीवर दिसत होती. दाजीसाहेबांचा स्वभाव विनोदी आहे. विनोदी भाषेंत स्वामींची ओळख करून देतांना सहज दाजीसाहेब उद्गारले " हा दाढीवाला श्रीबाबांविषयीं माहिती गोळा करून बाबांचे चरित्र इंग्रजींत लिहिणार आहे. त्यांनीं आधुनिक मद्रासेकडील सत्पुरुष श्रीरमण महर्षि यांचे चरित्र लिहिलें आहे, तसेंच श्रीमत् शंकराचार्य यांचेही चरित्र लिहिलें आहे. व अलिकडे श्रीउपासनी महाराजांचे चरित्र लिहिलें आहे." हे शेवटचे शब्द कानीं पडतांच एकनिष्ठ साईभक्त भाऊसाहेबांस कसेंसेच वाटलें हें त्यांच्या कावऱ्या बावऱ्या चेहऱ्यावरून दिसूं लागलें. व विनोद भलत्या थराला गेला. स्वामींच्या कार्याला प्रथमग्रासेमक्षिकापात झाला याबद्दल वाईट वाटून दाजीसाहेब खालीं मान घालून निश्चिष्ट बसले. व हे उपासनीकडून आले आहेत मी कांहीं सांगू शकत नाहीं असें त्वेषानें मोठ्या आवाजानें भाऊसाहेब उद्गारले. सर्वांची निराशा झाली. स्वामींची मनःस्थिति काय झाली असेल हें लिहिण्यापेक्षां कल्पनेनें जाणणें बरें. इतक्यांत विजेचे बटन दाबतांच लख्ख प्रकाश पडावा व आनंदी आनंद व्हावा त्याप्रमाणें भाऊसाहेबांच्या एका उत्साहपूर्ण वाक्यानें आनंदाच्या

लहरींचा वर्षाव सर्वांवर झाला.'' बाबांविषयींचे अनुभव काय सांगावें ? माझ्या श्वासा-श्वासातून नसनसातून रोम रंध्ररंध्रातून बाबांचा संचार अव्याहत चालू आहे. बाबांचे हुकमती शिवाय माझे कांही चालत नाहीं. माझ्या सर्व चलन वलनादि किया बाबांचे इच्छेनें चालतात हा काय लहान चमत्कार आहे ? तुम्हाला पाहिजे तर मी माझे बाहेर गांवचे काम आटोपून परत ता. ७ जूनला पुण्यास येईन तेव्हां तुम्हास बाबांचे कांही अनुभव सांगन. तुम्ही सकाळीं ८ वाजतां जरूर या '' हेंच ते आशापूर्ण वाक्य. स्वामींना आशेचा किरण दिसूं लागला. त्यांचे चेहऱ्यावरील म्लानता पार मावळून गेली. व या कसलेल्या लेखकाला आपणाला ता. ७ ला बहुमोल लाभ होणार म्हणून हर्ष झाला. दाजीसाहेब हे विनोदाचे आहारी जाऊं नये या विचारांत गर्क झाले. विचारशील साई-निष्ठ प्रोफेसर मजकूर काय अनुभव असतील या विचारांत निमग्न झाले. प्रिय वाचक, लेखकांची स्थिति फार निराळी झाली. आपल्यास ता. ७ ला कमिशनचे काम ठाण्यास आहे. तिकडे गेले पाहिजे. व आपल्यास हा मेवा लुटण्यास मिळणार नाहीं म्हणून लेखकाचे मन उदास व खिन्न झालें.

या सद्भक्ताचे अनुभवाचे चार शब्द आपल्यास ऐकायला मिळावे हा मनापा-सूनची इच्छा पण आतां इलाज राहिला नाहीं. त्याने साईनाथांचे कृपेवर हा गोष्ट सोपविली. व ही प्रार्थना श्रींचे चरणी निवेदन केलेली तेथे रुजू झाली. मनांत ता. ७ ला हजर राहावें असे तरंग उठत. पुनः कर्तव्य म्हणून ता. ७ ला ठाण्यास हजर झाले पाहिजे असे जोराने विचाराचे काहूर डोक्यात उठे. डोके सुंद झाले. विचार सुचेना. अखेर ता. ६ ला पहाटे स्वप्न लेखकाला पडले. त्यात साईचरित्रात [ अध्याय ८ ] दिलेल्या भिक्षेस जाण्याचे वेळच्या वेळच्या फोटोप्रमाणें मनुष्याएवढी हुबेहुब बाबांची आकृति स्पष्ट दिसली. ती अजून डोळ्यापुढें उभी आहे. असा भास होतो. अशी ती स्पष्ट निटस, रेखीव आकृति स्वप्नात बराच वेळ उभी होती. सकाळी उठल्यावर वाटले कीं, स्वप्नाचा कोहींतरी संबंध आहे. मात्र उलगडा कांहीं केल्या होईना. परंतु भाऊसाहेबांचे अनुभव ऐकण्याचा निश्चय कायम ठरला व ता. ७ चे काम श्रीसमर्थांचे इच्छेवर ठेऊन पुण्यास ता. ७ ला नक्की राहण्याचे ठरले. व कारकुनाला पत्र पाठऊन ता. ७ ला कोणी कोर्टात साक्षीस आल्यास ता. ८ ला हजर राहणेंचे कळविण्यास लिहिले. झाले ता. ७ चा दिवस उजाडला. ठरल्याप्रमाणें भाऊसाहेबकडे वरील मंडळी उत्कंठेने व कुतुहल युक्त अंतःकर-णानें हजर झाली. लेखक हजर राहिला. भाऊसाहेबांना त्या दिवशीहि कांहीं काम होतेच तरी थोडा वेळ येण्याचे त्यांनी कबूल केले. व श्रीबाबांच्या अनुभवाच्या गोष्टी एका मागून एक अशा बऱ्याच सांगितल्या. त्या गोष्टी ऐकत असतांना सर्वांच्या वृत्ती थरारून गेल्या. व जे भाऊसाहेब थोडा वेळ सांगणार होते तेच ३॥–४ घंटे अस्खलीत अमोघ वाणीने हकीकत सांगत होते. प्रोफेसर मजकूर, दाजीसाहेब व स्वामी यां सारखी विद्वान माणसे

ऐकत तटस्थ बसली होती. ऐकलेल्या गोष्टींदिकी खाली एकदोन गोष्टी देत आहे.

एका फौददारी खटल्यात कांहीं शिर्डीकडील लोकांना शिक्षा झाली होती. खट-ल्याचे कागदपत्र व जज्जमेंट त्यावेळीं तेथें असलेल्या कायदेपंडीतांनीं कै. श्री. दादा-साहेब खापर्डे, रा. ब. साठे वगैरे यांनीं वाचून आरोपी अपिलात सुटणार नाहीत असे मत दिले होते. शिर्डीचे तात्या पाटील यांनी ते कागद घेतले व श्रीपुढें ठेऊन काम करावें असे श्रीस विचारले. श्रीनी सांगितले ते कागद आपल्या भाऊकडे घेऊन जा व हे काम कर असे बाबांनी सांगितले आहे असे त्यांस सांगा लागलीच तात्या पाटील कागदपत्र घेऊन नाशकास भाऊसाहेबाकडे आले व झालेली हकीकत सांगितली. बाबांची आज्ञा काम चालविण्याची आहे असे ऐकतांच त्यांस स्फुरण चढले. त्यांनी कसेबसे जज्जमेंट वाचून अपिल मेमों खरडला व नगरला कलेक्टरसाहेबाकडे अपिल गुदरण्याचे तयारीस ते लागले. भाऊसाहेबांचा खाक्या निराळाच आहे. एकदा फी सांगतील तीच कायम. त्यात रतीभर फरक नाहीं. व सर्व रक्कम प्रथम आली तरच काम पहाणार पण यांत सर्वच वेगळा प्रकार. फीची भाषा नाहीं. बाबांची आज्ञा प्रमाण हीच फी. बाबाच सर्व करसार ही मनाशी खुणगाठ नेहमी बांधलेली तात्यांनीं कसेतरी करून ३०० रु. जमा केले होते नि पुढें ठेवले. भाऊसाहेब व तात्या नगरास कलेक्टरसाहेबांचे मुक्कामावर जाऊन ऑफिसांत चिटणीस शिरस्तेदार वगैरे यांची गांठ न घेता कलेक्टरसाहेब यांचे बंगल्यावर गेले व पट्टेवाल्याकडून आपण आल्याची वर्दी दिली. साहेबबहादुरांनी येण्याचे प्रयोजन विचारले त्यावर खालच्या मॅजिस्ट्रेटच्या निकालावर अपिल दाखल करून जामि-नावर आरोपींना खुलें करण्याचा अर्ज देणेचा आहे असे सांगितले. मॅजिस्ट्रेटने दिलेला निकाल बरोबर असला पाहिजे असे साहेबबहादूर उद्गारले. त्यावर मॅजिस्ट्रेटनी एकच बाजू खरी मानली आहे; दुसऱ्या बाजूच्या म्हणजे आरोपीच्या पुराव्याची बरोबर प्रतनी केली नाहीं त्यामुळें आरोपीस अन्याय झाला आहे. आरोपीचा पुरावा फार चांगला आहे व तो ग्राह्य होऊन आरोपीस सोडून द्यावयास पाहिजे होता वगैरे अपिलाची सुना-वणी भाऊसाहेबांनी केली. साहेब म्हणाले अपील मेमो मजकडे द्या व त्यावर वरील कारणे लिहून आरोपीस दोषमुक्त केल्याचे लिहिले नंतर भाऊसाहेब यांस कलेक्टरसाहेब विचारतात. प्रश्न "तुम्ही साईबाबा पाहिले आहेत काय" उत्तर होय. प्रश्न ते कोण हिंदु कि मुसलमान होते ? उत्तर अपण त्यास जसे पाहूं तसे ते होते.

भाऊ साहेबांची व त्या कलेक्टरचा पर्वीचा ओळख नव्हती. नंतर ऑफिसांत जाऊन क. साहेबांचा हुकूम त्यास दाखविला. ती सर्व मंडळी चकित झाली. ते म्हणाले नेहमीची पद्धत सोडून हे झालें आहे ऑफिसात अपिल दाखल केले नाहीं. त्यावर नंबर पाहून घेतला नाहीं. आपण वकील असून नेहमीची पद्धत कशा सोडलीत ? त्यांस योग्य ते उत्तर देऊन आरोपिना खुले करण्याबद्दल हुकूम घेऊन व त्यास सोडवून घेऊन

भाऊसाहेब श्रींच्या दर्शनास, तारया व सुटलेले आरोपी घेऊन शिरडीस गेले शिर्डीस आल्यावर रा. ब. साठे त्यावेळी जेवण करीत होते त्यांनी भाऊसाहेबास आपिलाचे विचारले 'तें सुटले' असे उत्तर मिळताच जेवता जेवता उठून आनंदाचे भरांत त्यांनीं भाऊसाहेबाना आलिंगन दिले. श्रींचे दर्शनास गेल्यावर मशिदींत दृष्टादृष्ट होतांच, बाबांनीं भाऊ साहेबास 'माझे ३०० रु. दे' असे म्हटले भाऊसाहेबानी ३००रु. श्रीस श्रींचे म्हणून अर्पण केले. कारण सर्वच बाबांनीं केले अशी त्यांची खात्री होतीच व त्यांचें प्रमाणेच वाचकाचीहि खात्री होईल.

एकदा श्री जसे भिक्षेस जातात तसे आपण जावे असे भाऊसाहेबांच्या मनात आले व त्याप्रमाणे ते शिरडीस भिक्षा मागण्यास मान अपमान आपल्या दर्जा बाजूस ठेऊन नम्र-भाव धारण करून निघाले. जी भिक्षा मिळाली ती त्यांना दोन दिवस पुरली. व भिक्षेचें अन्न त्यांना अमृतातुल्य वाटले. ते खाल्यापासून त्यांच्या वृत्तींत फार फरक पडला. व श्री बाबा भिक्षा का मागतात याचे थोडेसे रहस्य त्यांस समजले. श्री रामदास स्वामींनी भिक्षा मागितली व ती प्रथा अद्याप शिष्य संप्रदाय चालविलेल्या व त्यांनीं मोठे अचाट प्रचार कार्य व धर्म कार्य केले. त्याची फळे चिरकाल स्मरणीय श्री शिव-छत्रपतींच्या मराठी साम्राज्य स्थापनेत दिसून आली.

बाबांना भिक्षा मागण्याची मुळीच जरूर नव्हती .त्यांचे .बसल्या जागेवर इछित श्रम झाले असते. पण आपल्या आचरणानी त्यानी भिक्षेचे महत्व जगास सूचित केले आहे. भिक्षा मानण्याचें मुख्य उद्देश नम्रता उत्पन्न होण्याचा आहे. ही गोष्ट लेखकास भाऊसाहेबांनी भिक्षा मागितल्याचे ऐकल्यावर कळले.व आपल्या स्वप्नाचा व भिक्षेचा असा गूढ संबंध आहे हे त्याचे लक्षात ही हकीकत ऐकल्यावर आले. भाऊसाहेबासारखे उच्च दर्जाचे वकील ज्यांनी दोन संस्थानांच्या मंत्रीपदाचे काम केले होते ते भिक्षा मागण्यास उद्युक्त होतात किंवा त्यांस उच्च भाव जागृत करण्याकरिता श्री बाबा उद्युक्त करितात असे या गोष्टींस महत्व आहे. ' नम्र झाला भूता । तेणें कोंडिले अनंता ' ॥ हेच ते उच्च तत्व श्रीबाबांनी आपल्या सर्वांना, आपणास परमपद जे ' श्रेयस ' त्या पदाकडे नेण्याकरिता श्री बाबांनी आजन्म आपल्या आचरणानें सर्वांना शिकविले. पण आपण ते ध्यानी आणले नाहीं. आत तरी प्रिय वाचक हो. ध्यानीं आणण्याचा प्रयत्न आपण सर्व करू या.

या प्रमाणें श्रींच्या भिक्षेचे कोडे थोडेतरी उलगले.

ता. ७ जूनला वरप्रमाणे भाऊसाहेबांचे अमोल अभूतपूर्व अनुभव श्रवण केल्यावर आपणास धन्य मानून घेतल्यावर, व शतशः श्रींस धन्यवाद देऊन लेखक ता. ८ ला ठाण्यास आला व ता. ७ ची समन्सें बजाऊन आली नाहींत हे असे त्यास कळून आले. व ता. ७ ला ठाण्यास हजर न झाल्याने नुकसानी कोणाचीच झाली नाहीं हे त्यास समजलें व श्रींचे चरणी निष्ठा ठेवल्यास ती अंतीं फलदायीच होते. ही श्रींची शिकवण त्यास कळून चुकली.

श्री सांइ सेवक पदरजःकण

# SRI SAI MANDALI

NAWABPET, NELLORE

Proceedings of Sri Sai Baba meetings organised by
Secretary

C. Cunniah Chetty,
Millowner.

Dear Mr. Kharkar,

I have much pleasure to give herein below the proceedings during the stay of Sri B. V. Narasimhaswami garu at Nellore from the 14th to 19th instant.

On 14-9-1939 exactly at 6-15 P. M. the train arrived on the Nellore platform bringing in Sri B. V. Narasimhaswami from Madras. Band was arranged on the railway platform and as soon as the train steamed into the platform, the band was played with shouts of "Sri Sai Babaki Jai." It was a grand reception to Swamiji. Swamiji was received by us on the platform and was taken outside the railway station where Baba's portrait was gaily decorated with flowers in a palanquin carried by four Bhaktas. Immediately Harati was given to Baba in the presence of Swamiji and the procession started with thousands of people. On the fore front of the procession the band was playing and next to that Nagaswaram. In the rear of Baba's portrait there was Bhajana of Baba's songs with all the requisite instruments

like harmonium, mridangam etc. On the rear side of Boba's portrait, a silk umbrella was carried by one of the Bhaktas. About half a dozen pla-cards were carried by Bhaktas whereon was written " Sri Sai Baba Bhajana." The procession was very picturesque and grand, attended by hundreds of merchants, officials and lawyers. On the way to Bhajana hall several Bhaktas garlanded Baba and gave harathi. Through out the course of the procession shouts of joy were raised as " Sri Sai Babaki Jai. " " Sri Narasimhaswamiki Jai " "and Sri Sai Mandaliki Jai " The procession came on slowly and reached the Bhajana hall at Gundlapalli Narasimhulu Chetty choultry, Nawabpet by 8-30 P. M. The distance between the railway station and Bhajana hall is only half a mile and it took two hours for the procession to reach the destination. As usual Baba bhajana commenced at the Bhajana hall at 9-30 P. M. and it was largely attended to. The Bhajana hall was gaily decorated. At the start of the Bhajana Sri Narasimhaswamiji performed Ashtothara puja to Baba and with Harathi the Bhajana commenced and went on till 11-30 P. M.

On 15-9-1939 a public meeting was arranged by the progressive Union in the Town Hall and Sri Swamiji gave a lecture on Baba and his miracles. The town hall was fully packed up to hear the lecture from Swamiji in English.

On 16-9-1939 there was a meeting at Sri Kanyakaparameswari temple, Stonehousepet, organised by the Vysya Athletic Association of Stonehousepet. Almost

all the merchants of the town attended the meeting and Swamiji gave a lecture in Telugu about Baba.

On 17-9-39 Baba puja was performed at 3-30 P. M. at Sri Ramakrishna Grandhalayam at Nawabpet and a short lecture was given by Swamiji in Telugu on Baba. The hall was fully packed and all the members of the Grandhalayam attended the puja and meeting. The same evening there was a lecture by Swamiji at Sri Anjaneyswami temple in the heart of the town The meeting was well attended by ladies.

On 18-9-39 in the morning there was Baba puja performed at the Theosophical lodge, Mulapet, in the presence of Swamiji and a lecture was delivered by Swamiji in the Sanskrit college at 9 A. M. In the evening Swamiji addressed the students at the V. R. College and spoke of Baba's greatness. The same night at 7-30 P. M. Swamiji gave a short lecture to a big crowd at the Lathi chowk in the centre of the town and spoke for a few minutes on Baba.

On 19-9-39 Swamiji left this place to Kavali at 3-15 P. M. by train.

---

# मद्रास प्रांतांतील प्रचारकार्य

**श्री. साईभक्त स्वामीजी** यांचे चालू प्रचारकार्याविषयीं त्यांचेकडून व त्यांचे प्रचारकार्यामुळें तामील, तेलगू वगैरे प्रांतांत श्री. साई मंडळें स्थापन झालेली आहेत त्या मंडळांचे चिटणीसांकडून श्री साई बाबा शिरडी संस्थानचे चिटणिसांस आलेले कांहीं पत्रांचे अनुवाद.

-१-

## रावबहादुर सी. एन. कुपुस्वामी आयर

जज्ज यांचा बंगला
कॅलिकत.
ता. १६-८-३९

प्रिय मित्र श्रीयुत खारकर यांसः—वर निर्दिष्ट डिस्ट्रीक्ट जज्ज साहेब हे या मलाया प्रांतांत बाबाभक्ती प्रचार कार्य फारच जोरानें करीत आहेत. त्यानीं बाबांची नामावली मलाई भाषेंत छापून हजारों प्रती मोफत वाटित आहेत. माझ्या शिरडीचे साईबाबांची ओळख या मलाई भाषेंत प्रसिद्ध केलेल्या पुस्तकाच्या शंभर प्रती त्यानीं विकत घेऊन मोफत वाटिल्या.

त्यानीं मला अगदीं अपरिचित अशा गांवीं मला बोलावून घेऊन सभा भरवून बाबांची माहिती मजकडून जनतेस करून दिली. सभेस डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट साहेब अध्यक्ष होते. गांवांतील सुशिक्षित, विद्वान व सर्व निवडक मंडळी हजर होती.

मंगलोर, कॅनानुर वगैरे आणखी बरेच गांवीं त्यानीं अशाच या मलाई प्रांतांत बाबाभक्ती प्रचारक संमेलनें भरविणेचे ठरविलें आहे.

जज्जसाहेबांची बाबांचे ठिकाणीं दृढ श्रद्धा आहे. बाबांचे अनुसंधान त्यांचे सर्व काळ चालू असते व दिवसांत ५० वेळां तरी ते बाबांचे स्मरण करीत असतात. सकाळ संध्याकाळ बाबांचे पुजन व आरती यांचेकडे होते व भक्तमंडळीस प्रसाद वाटणेंत येतो.

अंतःकरणपूर्वक आपला,

**बी. व्ही. एन. स्वामी**

—२—

अध्यक्ष:—
बी. व्ही. नरसिंहस्वामी
चिटणीस:—
रावसाहेब बी. पापियाचेटी

श्री साई मंडळी मद्रास
५५ स्ट्राटेनमुथियामुदाली रस्ता
मद्रास.
ता. २०।९।३९

प्रिय मित्र मिस्टर खारकर यांसः—

स्वामिजी हल्लीं आंध्र प्रांतांत प्रवास करित आहेत. आमचे गांव जे नेल्लोर शहर तेथें हाजारों लोक बाबांचे भजनीं लागले आहेत. नुकतेंच स्वामिजी तेथें गेले वेळीं रेल्वे-स्टेशनपासून आमचे बगीचापर्यंत तमाम हाजार जनसमूह बाबांचे फोटो मिरवणुकीबरोबर स्वामींचे स्वागतास जमला होता.

अंत:करणपूर्वक आपला,
बी. पापियाचेटी

—३—

श्री साई मंडळी, नेलोर, यांचे चिटणीसांकडून श्री साईबाबांचे प्रचार कार्याकरितां केलेले उपक्रमाचा अहवाल संस्थानचे चिटणीस ( श्रीयुत खारकर ) यांचेकडे आले वरून त्याचा अनुवाद.

प्रिय मित्र मिस्टर खारकर यांसः—

श्री स्वामी नरसिंह गुरु यांचे येथें आगमन ता. १४ सप्टेंबरला झाले. ते वेळीं स्टेशनवर त्यांचे स्वागतास मोठा जनसमूह हजर होता. गाडी स्टेशनात येतांच बँड वादनानें व श्री साईबाबाकी जय अशा जयघोषांत त्यांचे स्वागत पुकारून त्यानां स्टेशनवर बहु आदरानें उतरून घेऊन स्टेशन बाहेर श्री साईबाबांचा फोटो पुष्पहारानें सुशोभित करून पालखींत आणिला होता, त्याची आरती करून मिरवणुकीस सुरवात केली. मिरवणुकींत पुढें बँड वगैरे वाद्यें वाजत होती. पालखी मागें बाबांची भजनी मंडळी होती, पालखीवर रेशमी छत्र धरिले होते व श्री साईबाबा भजनाचे म्हणून मिरवणुकींत फलकही होते. एकंदर देखावा फारच मनोवेधक होता व त्यांत शेंकडो व्यापारी, आधिकारी व वकील वगैरे सुशिक्षित वर्ग सामील झाला होता. वाटेंत बाबांस ठिकठिकाणीं आरत्या व पुष्पहार आर्पण होत होते व मिरवणुक निश्चीत भजन हॉलकडे स्टेशनवरून सायंकाळचे

६–१५ ला निघोन ८–३० ला पोहोचली. येणेप्रमाणें सरासरी आर्धा मैलाचे वाटेस दोन तास लागले.

भजन हॉल फारच शृंगारिलेला होता. तेथें रात्रीं ९–३० ला स्वामिजीनीं पुजा केली व नंतर भजन सुरू झालें तें रात्रीं ११–३० पर्यंत चाललें. भक्त मेळा फारच मोठा जमला होता.

ता. १५ ला प्रोग्रसिव्ह मंडळामार्फत टाऊन हॉलमध्यें पब्लीक मिटिंग भरविली होती. व स्वामिजीनी बाबांचे अद्‌भूत शक्तिवर भाषण केलें. भाषण इंग्रजींत होऊन टाऊन हॉल चिकार भरला होता.

ता. १६ श्री कन्यक परमेश्वरी देवळांत व्यास अथलेटिक आसोसिएशन मार्फत सभा झाली. गांवांतील तमाम व्यापारी वर्ग हजर होता व स्वामीजींचे भाषण तेलगु भाषेंत झाले.

ता. १७ ला दुपारीं ३–३० ला श्री रामकृष्ण ग्रंथालयांत स्वामीनी बाबांची पुजा केली व तेलगु भाषेंतच बाबाविषयीं लहानसे भाषण केलें. ग्रंथालयाचे सर्व सभासद व भक्त मंडळाची चिकार गर्दी झाली होती. त्याच दिवशीं सायंकाळीं गांवाचे मध्यभागांत श्री अंजनेस्वामी देवळांत स्वामीजींचे पुन्हा भाषण झाले ते वेळीं स्त्री समूह बराच जमला होता.

